## तुर्तातुर्त मनाई हुकूम अर्ज निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश
## (पारित केल्याचा दिनांक १८ माहे एप्रिल, २०२३)
CNRNO.MHLA140017762022

प्रस्तूत अर्ज वादीनी शपथपत्रासह ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ९४ सह क्रम ३९ नियम ०१ व ०२*** अनुसार दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इतरांनी ***वाद मिळकत*** कोणालाही विक्री किंवा हस्तांतर करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे.

**वादीच्या अर्ज नि.क्र.०५ व वादपत्रातील तथ्ये खालीलप्रमाणे :-**

**०२.** वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटुंबाचे घटक आहेत. वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ४ हे नात्याने बहीण–भाऊ आहेत. वादींचे वडील मयत श्री. रावसाहेब पाटील यांची मौजे वांगजी ता. औसा शिवारात जमीन सर्व्हे क्रमांक ६९ मधील प्रतिवादी क्र. १ च्या नावे असणारी ६७ आर, सर्वे क्र. ६९ मधील प्रतिवादी क्र. ५ च्या नावे असणारी १हे. २१आर., सर्वे क्र. ६९ मधील प्रतिवादी क्र. ६, ७ आणि ८ च्या नावे असणारी प्रत्येकी १ हे., सर्वे क्र. ९९ मधील मयत रावसाहेब यांच्या नावावर असलेली १ हे. ८३ आर. आणि १०१/ब मधील प्रतिवादी क्र. १ च्या नावे असलेली १ हे. ११ आर ही शेतजमीन ***वाद मिळकत*** (वादपत्र कलम ०२ आणि अर्ज **नि.क्र.०५** कलम ०३) आहे.

**०३.** वादी, प्रतिवादी क्रमांक २,३ व ४ या प्रतिवादी क्र. १ च्या बहिणी असून त्यांचा दावा मिळकतीत अविभक्त हिस्सा आहे. मात्र तरीही प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीच्या महसूल अभिलेखातील त्याच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकत वादीच्या संमतीविना इतर प्रतिवादींशी संगनमत करुन

बेकायदेशीर रित्या हस्तांतरीत, विक्री केली आहे. त्यामुळे सदर हस्तांतरण आणि विक्री वादीवर बंधनकारक नाही. दावा मिळकतीची अद्याप वाटणी झालेली नाही. वादीचा अविभक्त हिस्सा नाकारण्यासाठी प्रतिवादी क्र. १ ते ८ दावा मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहेत. म्हणून वादीने वाटणी व स्वतंत्र ताबा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे.

**प्रतिवादींच्या कैफियत व म्हणण्यातील तथ्ये खालीलप्रमाणे** :-

**०४.** प्रतिवादी क्रमांक १ ते ४ आणि ६ ते ८ यांनी कैफियत/जवाब दावा **नि.क्र.२८** वर दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक ५ ने **नि.क्र.३४** वर त्याचा जबाबदावा दाखल केला आहे. प्रतिवादींनी वादपत्र व अर्ज **नि.क्र.०५** मधील संपूर्ण विरुध्द मजकूर नाकारला.

**०५.** प्रतिवादी क्रमांक १ ते ४ आणि ६ ते ८ यांनीअसे कथन केले की, वादी आणि प्रतिवादी एकत्र कुटूंबाचे घटक नसून दावा मिळकत वडीलोपार्जित नाही. दावा मिळकत सर्वे क्र. ९९ ही शासनाने संपादित केलेली आहे. वादी प्रतिवादींचे वडील श्री. रावसाहेब पाटील हयात असताना त्यांनी साक्षीदार बाबासाहेब पाटील आणि बाबुराव कावळे यांचे समक्ष उर्वरित दावा मिळकतीची वाटणी करुन दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या हिश्यास दिली आहे. प्रतिवादी क्र. १ ने कौटूंबीक गरजेकरिता दावा मिळकत सर्वे क्र. ६९ मधील १ हे. क्षेत्र मयत रावसाहेब पाटील यांचे कर्ज सारण्यासाठी श्री. सुधीर दिलीप पाटील यांना विक्री केले होते. प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत सर्वे क्र. १०१/ब मधील एकुण ४ हे ८८ आर क्षेत्र स्वतःच्या आणि प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांच्या नावे हस्तांतरीत केले आहे. सबब वादीचा दावा मुदतीत नाही. वादीच्या दाव्यास आवश्यक पक्षकार सामील न केल्याने कायद्याची बाधा येते. म्हणून अर्ज **नि.क्र.०५** नामंजूर करावा

अशी विनंती केली.

०६. प्रतिवादी क्रमांक ५ यांनी जवाब दावा/कैफियत **<u>नि.क्र.३४</u>** वर दाखल करुन प्रतिवादी क्रमांक १ ते ४ आणि ६ ते ८ यांच्या कथनाला दुजोरा दिला आहे. प्रतिवादी क्रमांक ५ यांनी अर्ज **<u>नि.क्र.०५</u>** नामंजूर करावा अशी विनंती केली.

०७. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. एस.सी.बिराजदार** आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ आणि ६ ते ८ तर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. एल.एन. देशपांडे** आणि प्रतिवादी क्र. ५ तर्फे विद्वान विधीज्ञ **श्री. जी.एच.कुसुमकर** यांचा युक्तिवाद ऐकला.

०८. दोन्ही पक्षांचे कथन व कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तूत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थितीत झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतदर्शनी दावा त्यांच्या लाभात असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |
| २ | वादी न्यायाचा/सोयीचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |
| ३ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ४ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यास पात्र आहेत काय? | **होकारार्थी.** |
| ५ | आदेश काय? | **अर्ज मंजूर केला.** |

०९. **वादीचा कागदोपत्री पुरावा**

०१. सर्वे क्रमांक ६९ चा अधिकार अभिलेख उतारा,
०२. सर्वे क्रमांक ९९ चा अधिकार अभिलेख उतारा,
०३. सर्वे क्रमांक १०१/ब चा अधिकार अभिलेख उतारा,
०४. फेरफार नोंद क्र. ४३० च्या उता–याची छायांकित प्रत.

१०. **प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ ते ८ चा कागदोपत्री पुरावा**

कागदपत्रांची यादी नि.क्र.३८ सोबतची कागदपत्रे.

०१. खरेदीखत दस्त क्र. १५१५/२००६ ची मुळ प्रत,
०२. फेरफार नोंद क्र. ७८८ चा उतारा,
०३. सर्वे क्रमांक ६९ चा अधिकार अभिलेख उतारा,
०४. सर्वे क्रमांक ६९ चा ८–अ चा खाते उतारा.

११. **प्रतिवादी क्र. ५ चा कागदोपत्री पुरावा**

कागदपत्रांची यादी नि.क्र.३३ सोबतची कागदपत्रे.

०१. खरेदीखत दस्त क्र. १५१५/२००६ ची मुळ प्रत,
०२. खरेदीखत दस्त क्र. ११०६/२००३ ची मुळ प्रत,
०३. फेरफार नोंद क्र. ७८८ चा उतारा,
०४. सर्वे क्रमांक ६९ चा अधिकार अभिलेख उतारा.

## युक्तिवाद

**१२.** वादीतर्फे विधीज्ञ श्री. बिराजदार यांनी असा युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटुंबाचे घटक आहेत. वादी आणि प्रतिवादींमध्ये नातेसंबंध कबूल आहेत. वादीतर्फे विधीज्ञ श्री. बिराजदार यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, वाद मिळकत ही वादीचे वडील श्री. रावसाहेब पाटील यांची वडीलोपार्जित मिळकत होती.

**१३.** वादीतर्फे विधीज्ञ श्री. बिराजदार यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रमांक १ यांनी इतर प्रतिवादींशी संगनमत करुन वादीचा अविभक्त हिस्सा टाळणेसाठी दावा मिळकत अनुक्रमे श्री. सुधीर पाटील, प्रतिवादी क्र. ३, प्रतिवादी क्र.५ ते ८ यांना विक्री आणि हस्तांतरीत केली. सदर दावा मिळकतीचे विक्री आणि हस्तांतरण वादीच्या संमतीशिवाय असल्याने ते बेकायदेशीर असून वादीवर बंधनकारक नाही.

**१४.** वादीतर्फे विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून आजवर काही दावा मिळकत हस्तांतरीत केली आहे. वादीचा दावा मिळकतीत अविभक्त हिस्सा आहे. प्रतिवादी दावा मिळकत अन्य इसमांना विक्री करण्याच्या तयारीत असल्यामुळे त्यांचेविरुध्द मनाई हुकूम देण्यात यावा.

**१५.** प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. देशपांडे यांनी असा युक्तिवाद केला की, वादी प्रतिवादींचे वडील श्री. रावसाहेब पाटील हे हयात असताना त्यांनी सन १९८० साली साक्षीदार श्री. बाबासाहेब पाटील आणि बाबुराव कावळे यांच्या समक्ष दावा मिळकतीची वाटणी प्रतिवादी क्र. १ च्या लाभात करुन दिली होती.

त्यामुळे वादी ही एकत्र कुटूंबाचे घटक नसुन दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत नाही. प्रतिवादी क्र. १ ने वडील मयत श्री. रावसाहेब पाटील यांचे नावावरील कर्ज सारणेसाठी आणि कौटूंबीक गरजेकरिता दावा मिळकतीचे विक्री आणि हस्तांतरण केले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा.

**१६**. प्रतिवादी क्र. ५ तर्फे विधीज्ञ श्री. कुसुमकर यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत सर्वे क्र. ६९ मधील १ हे. २१ आर. क्षेत्र त्यांनी श्री. सुधीर पाटील आणि प्रतिवादी क्र. १ यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताआधारे रोख मोबदला देवून खरेदी घेतली आहे. प्रतिवादी क्र. १ ने कौटूंबिक गरजेकरिता सदर दावा मिळकत विक्री केली आहे. तेव्हापासून सदर मिळकतीत प्रतिवादी क्र. ५ ची मालकी आणि ताबा आहे. सबब वादीचा अर्ज नामंजूर करावा.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक ०१ बाबत</u> –**

**१७**. दावा मिळकत वडीलोपार्जित आणि एकत्र कुटूंबाची असल्याचे दर्शविण्यासाठी वादीने फेरफार क्र. ४३० च्या नोंदीचा उतारा दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादी ही मयत रावसाहेब पाटील यांची मुलगी आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची बहिण असल्याचे दिसून येते. वादीने दाखल केलेला सर्वे क्र. ६९ च्या जुन्या अधिकार अभिलेख पत्राचे अवलोकन करता सदर मिळकत मयत रावसाहेब पाटील यांच्या नावे होती आणि त्यानंतर फेरफार क्र. ४३० नुसार वारसाने वादी, प्रतिवादी क्र. १ आणि त्यांच्या इतर बहिणींची मालक म्हणून नावे लागली. दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ची स्वसंपादित आणि स्वकष्टार्जित असल्याचे कोठेही कथन नाही. यावरुन दावा मिळकत उभयतांची हिंदू एकत्र कुटूंबाची अविभक्त मिळकत आहे असे सकृतदर्शनी सिध्द झाले आहे. म्हणून दावा

व अर्ज सकृतदर्शनी वादीच्या लाभात आहे हे स्पष्ट होत आहे. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०१** ला **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ०२ बाबत</u> –**

**१८.** प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत सर्वे क्र. ६९ वरुन १हे. क्षेत्र श्री. सुधीर पाटील यांना विक्री करताना आणि त्यानंतर सर्वे क्र. ६९ मधील २१ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. ५ ला विक्री करताना वादीची संमती घेतली नसल्याचे उभय पक्षांना मान्य व कबूल आहे. प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकत ६९ मधील प्रत्येकी १ हे. क्षेत्र प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांच्या नावे केल्याचे देखील प्रतिवादींना मान्य व कबूल आहे. दावा मिळकतीची पुर्वी वाटणी झाल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा प्रतिवादींनी आणलेला नाही अथवा त्या करिता साक्षीदारांचे शपथपत्र देखील सादर केली नाहीत. म्हणून प्रतिवादी वादीच्या अपरोक्ष वाद मिळकत विक्री किंवा हस्तांतरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून न्यायाचा/ सोयीचा समतोल वादींच्या हक्कात असून तो प्रतिवादीच्या हक्कात नाही. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०२** ला **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ०३ बाबत</u> –**

**१९.** वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे पैशांच्या स्वरुपात न भरुन येणारे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांना त्यांच्या अविभक्त हिस्स्याला मुकावे लागणार असून पैशांच्या स्वरूपात कधीही न भरुन येणारे नुकसान संभवत आहे. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०३** ला **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ०४ बाबत</u> –**

**२०.** वादी तुर्तातुर्त ताकीद हुकूम मिळण्यासाठी आवश्यक असलेले तिन्ही

घटक सिध्द करण्यात यशस्वी झाल्या आहेत. म्हणून मी **मुद्दा क्रमांक ०४** ला **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो. म्हणून मी, **मुद्दा क्रमांक ०५** ला उत्तर देण्यासाठी खालील आदेश पारीत करणे न्यायाचे झाले आहे असे समजतो.

**आदेश**

१. वादीचा शपथपत्रासह दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ९४ सह क्रम ३९ नियम ०१ व ०२ अनुसार दाखल केलेला अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ८ यांना दिवाणी व्यवहार संहिता १९०८ चे कलम ९४ सह क्रम ३९ नियम १ व २ अनुसार दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत त्यांनी अगर त्यांचेतर्फे इतरांनी वाद मिळकत कोणालाही विक्री किंवा हस्तांतर करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येत आहे.

Digitally signed by PRASAD DIPAK KOLEKAR
Date: 2023.04.19 16:43:10 +0530

दिनांक – १८/०४/२०२३ **(पी.डी. कोळेकर)**

ठिकाण – औसा. २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, औसा.